MHAH200010112018

**<u>नियमित दिवाणी कमांक २६६/२०१८ मधील निशाणी ५१ वरील आदेश</u>**
**आसाराम अंदुरे वि. लक्ष्मण गर्जे वगैरे ६..**

१. प्रतिवादी क्र. १ यांनी सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाखल कैफियतीमध्ये दुरुस्ती करीता दाखल केला आहे.

२. प्रतिवादी क्र. १ यांचे असे कथन आहे की, वादी यांनी प्रतिवादी यांचेविरुध्द सदरचा दावा जाहिर ठराव व निरंतर मनाई हुकूमाकरीता दाखल केला आहे. सदर प्रकरणामध्ये प्रतिवादी यांनी हजर होवून त्यांची कैफियत निशाणी १५ व प्रतिदावा दाखल केलेला आहे. सदर दाव्याची तारीख निशाणी ५ मानाई हुकूमाचे अर्जाचे चौकशी कामी नेमलेली आहे. प्रतिवादी क्र. १ यांनी दाखल कैफियत निशाणी १५ मधील पा.क्र. ८ वरील परिच्छेद क्र. ३१ चे शेवटी म्हणजेच प्रतिवादी क्र. १ यांचे प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीस नेण्याची मागणी केलेली आहे, यापूढे " व तो हिस्सा प्रतिवादी क्र.१ चे हिश्यावर खरेदीखतानूसार वाटपाचे कामी टाकण्यात यावी," अशा प्रकारची दुरुस्ती करण्याची परवानगी मागितली आहे. सदरील दुरुस्ती ही प्रतिवादी क्र. १ यांना करणे न्यायोचित आहे. सदरील दुरुस्तीमुळे प्रतिदाव्याचे व कैफियतीचे स्वरुपात, आकारात कोणताही बदल होत नाही अगर प्रतिवादी क्र. १ कोणतीही नविन कथन करीत नाही.

२. सदर अर्जावर वादी यांनी आपले म्हणणे दाखल करुन सदरचा अर्ज हा कायदेशिर नसून प्रतिवादी यांनी पूर्वी कैफियत दिलेली आहे, त्यानंतर सदर प्रतिवादी यांनी दाव्याचे कामकाज लांबविण्यासाठी सदरील कैफियतमध्ये दुरुस्तीसाठी अर्ज सादर केलेला आहे. प्रस्तूत अर्जातील संपूर्ण कथने खोटे व काल्पनिक आहेत. त्यामूळे सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

३. प्रतिवादी क्र. १ व वादी यांचे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी क्र. १ व वादी यांचे विधिज्ञ, त्यांच्या अर्जाचा व त्यावर दिलेल्या म्हणण्याच्या अनुषंगाने त्यांनी युक्तिवाद केला आहे. त्यामुळे तो स्वतंत्रपणे उध्दृत करण्याची आवश्यकता नाही.

४. खालील मुद्दे विचारार्थ उपस्थित होतात. ते मुद्दे व त्यावरील माझी उत्तरे त्याखाली नमुद केलेल्या कारणासाठी पुढीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

| **क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | प्रतिवादी क्र. १ मागतात त्याप्रमाणे कैफियतीमध्ये दुरुस्ती करुन मिळण्यास पात्र आहेत काय ? | होकारार्थी |
| ३ | काय आदेश? | अंतिम आदेशाप्रमाणे |

**<u>का र ण मि मां सा..</u>**

**<u>मुद्दा क्रमांक १ करीता..</u>**

५. प्रतिवादी क्र. १ यांनी अर्जाच्या पृष्टयर्थ स्वत:चे शपथपत्र निशाणी ५२ वर सादर केले आहे. वार्दीनी त्यांच्या म्हणण्याच्या पृष्टयर्थ शपथपत्र दाखल केलेले नाही. प्रस्तुतचा दावा हा अचल संपत्तीबाबतचा आहे. प्रस्तुत दावा हा प्रतिवादींविरुध्द जाहिर ठराव व निरंतर मनाई हुकूमासाठी दाखल केलेला आहे. याबाबत उभयपक्षांत दुमत नाही की, मुळ कैफियत नियाणी १५ मध्ये प्रतिवादी क्र. १ यांनी मागणी केल्याप्रमाणे नमूद केलेले नाही. अर्जात नमूद घटना या दावा प्रलंबित असताना म्हणजेच प्रतिवादी क्र. १ यांनी त्यांची कैफियत दाखल केल्यानंतर घडलेल्या आहेत.

६. कैफियत व प्रतिदाव्यातील कथन सिध्द् करण्याची जबाबदारी प्रतिवादी क्र. १ यांचेवर आहे. अर्जातील नमूद कारण पहाता प्रतिवादी क्र. १ यांनी केलेल्या विनंतीप्रमाणे दुरुस्ती आवश्यक असल्याचे दिसून येते. जरी कैफियत निशाणी १५ मध्ये दुरुस्ती केली तरी दाव्याचे अगर प्रतिदाव्याचे स्वरुप बदलत नाही. प्रतिवादी क्र. १ यांची जी मागणी आहे, तिच मागणी कायम रहाते. तसेच वार्दीच्या बचावातही फरक पडत नाही. प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढण्याकरीता व न्यायाच्या दृष्टीने व अर्जातील नमूद कारण पाहता अर्ज मंजूरीस सबळ कारण

दिसते. करीता आदेश.

**<u>आ दे श..</u>**

१. अर्ज निशाणी ५१ खर्च रुपये २००/- सह मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १ यांनी निशाणी ५१ मध्ये विनंती केल्याप्रमाणे पूढिल १४ दिवसांचे आत खर्चाची रक्कम अदा केल्यानंतर दुरुस्ती करुन दुरुस्त प्रत सादर करावी.

Sd/- x x x
**(ए. एस. बिराजदार )**
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
पाथर्डी, जि. अहमदनगर.

दिनांक : २७/०७/२०२२.